Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक ९(२)] शनिवार, एप्रिल १, २०२३/चैत्र ११, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार मेहकर नगर परिषदकरिता एकत्रित विकास योजना (मूळ हद्द क्षेत्राची दुसरी सुधारित + वाढीव हद्द क्षेत्रासाठी) तयार करण्याच्या इरादा जाहीर करणेबाबत.**

**नोटीस**

क्रमांक ५८२-२०२३.—

ज्याअर्थी, मेहकर नगर परिषद मूळ हद्द विकास योजना (सुधारित) ही शासनाची अधिसूचना टीपीएस-२६११-३७९-सीआर-१३२(१)-२०१२-युडी-३०, दिनांक ३ एप्रिल २०१२ ला मंजूर झाली असून दिनांक १५ मे २०१२ पासून अंमलात आली आहे. सदर योजना अंमलात येऊन १० वर्षाचा कालावधी झाला आहे ;

आणि ज्याअर्थी, मेहकर शहराची हद्दवाढ ही महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचना दिनांक ३१ मार्च २०२१ क्रमांक एमएनयु-२०१६-प्र.क्र. २८३-नवी-१८ अन्वये मंजूर झाली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम २१(२) अन्वये नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे ;

आता, त्याअर्थी, नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी मेहकर नगर परिषदेने मूळ हद्द क्षेत्राची व वाढीव हद्द क्षेत्राची एकत्रित विकास योजना तयार करण्याचे ठरविले आहे.

सबब, मेहकर नगर परिषदेने दिनांक २० मार्च, २०२३ च्या प्रशासकीय ठराव क्रमांक १ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३८ व कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये मूळ हद्द क्षेत्राकरिता विकास योजना दुस-यांदा सुधारित करणे व वाढीव हद्द क्षेत्राकरिता विकास योजना तयार करणे अशी एकत्रित विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे ;

उक्त अधिनियमाच्या कलम २३(२) नुसार मेहकर नगर परिषद मूळ हद्द क्षेत्र व वाढीव हद्द क्षेत्र मिळून एकत्रित विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगर परिषद कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे ;

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांचे आत मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांच्याकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. एकत्रित विकास तयार योजना करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**रमेश ढगे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मेहकर.

मेहकर :
दिनांक २८ मार्च २०२३.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १९.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of intention to prepare combined Development Plan of Mehkar Municipal Council (2nd revision of orginal limit + extended limit) as per Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No. 582-2023.—

Whereas, in the Mehkar Municipal Council, Distt. Buldhana Revised Development Plan of Original Limit has approved by Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-2611-379-CR-132(1)-2012-UD-30, dated 3rd April 2012 and came into force from 15th May 2012. It has been 10 years since the Revised Development Plan of Mehkar Municipal Council comes into effect.

And whereas, Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* it's Notification No. MUN-2016-C.R. 283-UD-18, dated 31st March 2021 extended limit of Mehkar Municipal Council. It is necessary to prepare the Development Plan for the area of Municipal Council as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred as "the said Act") for planned development of the said area.

Now, therefore, for planned development of Municipal Council area the Mehkar Municipal Council has decided to make combined Development Plan for the original boundary area and extended boundary area of the Council.

Hence, the Mehkar Municipal Council by its Resolution No. 1, dated 20th March 2023 has given consent to declare its intention to prepare combined Development Plan for Second time revision of Development Plan for original limit and for preparation of Development Plan for extended limit as per provision of Section 38 and Section 23 (*1*) read with Section 21(*2*) of the said Act. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in combined Development Plan of Mehkar Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council, as required under Section 23(*2*) of the said Act.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Mehkar Municipal Council within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestion/objection shall be duly considered while preparing the combined Development Plan.

RAMESH DHAGE,
Chief Officer,
Municipal Council, Mehkar.

Mehkar :
Dated the 28th March 2023.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.